# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

(महिला व बाल विकास विभाग)

फोन:-०२४०२३३३५३६-४०

contact@chhsambhajinagarmc.org

जा.क्र./मनपा /म.बा.क स/63/२०२५

दिनांक : 11 /12 /२०२५

जाहिर प्रगटन

महिला व बाल विकास विभाग

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका.

शासन निर्णय दिनांक 29 मार्च 2022 मध्ये नमुद केल्याप्रमाणे महानगरपालिका महिला व बालविकास विभागामार्फत महानगरपालिका हद्दीतील मुली व महिलांकरिता पोलिस भरती पुर्व प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार असुन या करिता इच्छुक प्रशिक्षणार्थी कडुन अर्ज मागविण्यात येत आहे. महिलां व मुलीना अधिक संधी उपलब्ध करून देणेसाठी पोलीस भरती पुर्व प्रशिक्षण आयोजित करण्यात येत आहे.

अर्जदाराकडुन प्रशिक्षणाकरिता अर्जासोबत खालील कागदपत्रे महिला व बाल कल्याण विभागात दाखल करणे आवश्यक आहे.

1) मनपा हद्दीतील रहिवासी असलेल्या 18 ते 33 वयोगटातील महिला व मुली पैकी ज्यांची उंची 155 सें. मी आहे त्यांनी पुढील आवश्यक कागदपत्र उदा. मनपा हद्दितील रहिवासी प्रमाणपत्र, किमान 10 वी उत्तीर्ण शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक, जातीचा दाखला व आधारकार्ड इ. कागदपत्रासह अर्ज दाखल करावे.

2) अर्जदारांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर सर्व मुली व महिला यांची मैदानी परिक्षा व लेखी परिक्षा घेऊन त्यांची गुणवत्तानुसार निवड करण्यात येईल. पात्र झालेल्या उमेदवारांनाच प्रशिक्षणासाठी प्रवेश दिला जाईल.

3) निवड झालेल्या प्रशिक्षणार्थी यांनी प्रशिक्षणास प्रवेश देणेपुर्वी प्रशिक्षण शुल्काच्या 10% रक्कम रूपये 2500/- लेखा विभागात भरणे आवश्यक आहे. भरणा केलेली पावती सादर केल्यानंतर प्रशिक्षणार्थीना प्रवेश निश्चीत करण्यात येईल.

4) सदरील अर्ज ऑफलाईन पध्दतीने महिला व बाल विकास विभागातील सौ.जयश्री दिवेकर मो. नं. 9834274698, सौ.वंदना थोरात मो. नं. :9730642110 यांच्याकडे स्विकारले जातील. तसेचhttps://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLScQXwZpuEeHCBcqJQqEmSp3V5P7RrvlNaSNgJgI1aiO9OTJaA/viewform?usp=header या गुगललिंकव्दारे ऑनलाईन पध्दतीने अर्ज नोंदणी करता येईल.

पात्र इच्छुक उमेदवारांनी परिपुर्ण अर्ज दि. 12/ 12/2025 ते दिनांक22/ 12/2025 पर्यंत कार्यालयीन वेळेत मनपा मुख्य कार्यालय , महिला व बाल विकास विभाग येथे अथवा ऑनलाईन पध्दतीने सादर करावा. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

Signed by Kalpita Kishor Pimple
Date: 11-12-2025 18:37:48

कल्पिता किशोर पिंपळे

अतिरिक्त आयुक्त 2

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका



File No. CSMC-29011(11)/65/2025-SOCIAL_DEVELOP (Computer No. 2322371)
Generated from eOffice by Jayshree Divekar, CSMC-SR_CRK(JSD), SENIOR CLERK , CHH.SAMBHAJINAGAR MUNICIPAL CORPORATION on 11/12/2025 06:58 PM